**<u>नि.दि.मु.क्र. ६४/२०२२ मधील नि.३८ खालील आदेश</u>**

**<u>CNRNOMHST16000457-2022</u>**

<u>(नारायण सहदेव सावंत वि. बाळु श्रीपती तनपुरे वगैरे)</u>

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्त करणेसाठी केला आहे.

**वादीचे अर्जातील कथन थोडक्यात असे आहे की,**

२. वादीने सदरचा दावा हा प्रतिवादी यांचेविरुध्द मौजे सोनगिरवाडी वाई, ता. वाई जि. सातारा येथील शेतजमीन मिळकत क्र. स.नं. १४९/२ या मिळकतीबाबत वादी व प्रतिवादी यांचेमध्ये दि. ३-११-२००८ रोजी झालेला विसार पावती करारनामा व दि. ११-१२-२०१५ रोजी झालेला मुदतवाढ करारनामा अन्वये दावा मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीपत्र होवून मिळणेकरिता, वाटप व निरंतर ताकीद मिळण्यासाठी दाखल केला आहे. सदरचा दावा प्रलंबित असताना सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.१ बाळु श्रीपती तनपुरे हे दि.१८.०६.२०२३ रोजी मौजे सोनगिरवाडी, ता. वाई, जि. सातारा येथे मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र.१ चे वारस दाव्यातील सरनाम्यात सामील करणे आवश्यक असल्याने व त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती गरजेचे आहे. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी क्र.१ यांचे नावास कंस करुन त्यांचे वारस म्हणुन खालीलप्रमाणे दाव्याचे सरनाम्यात दुरुस्ती होवून मिळण्याकरिता विनंती केली आहे.

दाव्याचे सरनाम्यात प्रतिवादी क्र.१ बाळु श्रीपती तनपुरे यांचे वारस-

**१अ) श्रीमती सुरेखा बाळु तनपुरे, वय.५२ वर्षे, धंदा-घरकाम**

**१ब) श्री अविनाश बाळु तनपुरे, वय.३० वर्षे, धंदा-घरकाम**

**१अ व १ब रा. मारुती मंदीर, यात्रा मैदान, मु.पो. सोनगिरवाडी, ता. वाई, जि. सातारा.**

**१क) सौ रोहिणी कल्याण निपाणे, वय.३२ वर्षे, धंदा-घरकाम, रा. मु. पो. महादर तळे, ता. जि. सातारा**

**१ड) श्री. अश्विनी योगेंद्र सासवडकर, वय.३३ वर्षे, धंदा-घरकाम, रा. स.नं. ८१/२, पर्वती दर्शन, पुणे-९,**

मयत प्रतिवादी क्र.१ यांना वर नमुद केलेले कायदेशीर वारस आहेत.

३. सदर अर्जावर प्रतिवादी क्र.६ व ७अ यांनी म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने अमान्य केली आहेत व असे कथन केले आहे की, वादी यांनी उशिर माफी अर्ज दिला नाही. सदरचा अर्ज योग्य मुदतीत दाखल केलेला नाही. करिता अर्ज रक्कम रुपये २,०००/– इतका खर्च वादी यांचेवर लादुन नामंजुर करण्याची विनंती केली आहे. तसेच प्रतिवादी क्र.८अ ते ८ड यांनी सदर अर्जास नाहरकत नोंदवली आहे.

४. वादीचा अर्ज व दाव्यातील कथने तसेच अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने सदरचा दावा हा प्रतिवादी यांचेविरुध्द दावा मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीपत्र करुन मिळावे, वाटप व निरंतरची ताकीद मिळणेकरीता दाखल केला आहे. वादीने प्रतिवादी क्र.१ यांचा मृत्युचा दाखला नि.३४/१ वर दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.२ हे दिनांक १८.०६.२०२२ रोजी मयत झालेले आहेत व वादीने सदरचा अर्ज दिनांक १४.१२.२०२२ रोजी दाखल केला आहे. सदरचा अर्ज हा मुदतीत दाखल केला नसला तरी, वादीच्या वारसांचा प्रतिवादी विरुद्ध दावा चालविण्याचा हक्क अबाधीत आहे. याउलट दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्याकरीता सदरची दुरुस्ती मंजूर करणे योग्य होणार आहे. दाव्याचे स्वरुप विचारात घेता व दाव्याचे अंतिम निराकरण होण्याकरीता अर्ज मंजूर करणे योग्य होईल. परंतु वादी यांनी सदरचा अर्ज मुदतीत दाखल न केल्याने, अर्ज त्यांचेवर खर्च लादुन मंजुर करणे योग्य व संयुक्तीक होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१. अर्ज रक्कम रुपये ३००/– इतका खर्च लादून मंजुर करण्यात येत आहे. सदरची रक्कम प्रतिवादी यांना अदा करण्यात यावी.

२. वादीने अर्जात नमुद केलेली दुरुस्ती नियमानुसार विहीत वेळेत करावी व दुरुस्त प्रत १४ दिवसांचे आत दाखल करावी.

SMRUTI SATISH KULKARNI
Digitally signed by SMRUTI SATISH KULKARNI
Date: 2023.10.10 17:21:53 +0530

ठिकाण – वाई. (एस. एस. कुलकर्णी)

दिनांक – १०.१०.२०२३. चौथे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर वाई.